लोकमत

## कर्करोगाला प्रतिबंध करणारे घटक :

### वनस्पतिशास्त्र विभागाचे संशोधन

# शिवाजी विद्यापीठ देणार हळदीची गोळी

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जेवण स्वादिष्ट बनविणारी हळद ही औषधी आणि आरोग्यासाठीदेखील लाभदायक ठरणारी आहे. ते लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठातील वनस्पतिशास्त्र विभागाने आरोग्यवर्धक, कुरकुमीनयुक्त, चघळता येणाऱ्या हळदीच्या गोळीची (च्युएबल टॅबलेट्स) निर्मिती केली आहे; त्यासाठी या विभागातील संशोधक आणि इन्क्युबेशन अँड ट्रेनिंग सेंटर इन बॉटनीचे समन्वयक डॉ. मानसिंगराज निंबाळकर यांनी संशोधन केले आहे.

विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सांगली, कोल्हापूर, कऱ्हाड आणि शेजारील कोकणामध्ये हळदीचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. ते घेणाऱ्या शेतकऱ्यांना काही अधिकचे उत्पन्न मिळावे, या उद्देशाने वनस्पतिशास्त्र (पान ७ वर)



## 'कुरकुमीन' कायम ठेवून निर्मिती

हळदीतील कुरकुमीन हा घटक पाण्यात न विरघळणारा आहे. तो सहजासहजी शरीरात शोषला जात नसल्याने त्याचे फायदे मिळविण्यासाठी त्याला इतर घटकांसोबत घेणे आवश्यक असते. त्यामुळे आपल्याकडे पूर्वीपासून हळद ही दूध, तेल अथवा तुपासोबत घेतली जाते. बाजारात मिळणाऱ्या हळदीच्या बहुतेक गोळ्यांमध्ये 'कुरकुमीन' हा घटक वेगळा काढून त्यापासून गोळ्या बनविल्या जातात; मात्र आम्ही तो वेगळा न काढता या गोळ्यांची निर्मिती केली असल्याचे डॉ. निंबाळकर यांनी सांगितले.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठ देणार हळदीची गोळी

(पान १ वरून) विभागात हळदीच्या विविध जातींवर संशोधन करण्यात येत आहे. त्यामध्ये प्रामुख्याने निरोगी रोपांसाठी ऊतीसंवर्धन, कुरकुमीन या घटकाला वेगळे करण्याच्या पद्धती, औषधी उपयोग, आदी प्रयोगांचा समावेश आहे. त्यातून हळदीच्या चघळता येणाऱ्या गोळीची निर्मिती झाली. जागतिक आरोग्य संघटनेने शिफारस केलेल्या प्रतिदिन मात्रा विचारात घेऊन या गोळीची पान, मिंट, जिंजर अशा फ्लेव्हरमध्ये निर्मिती केली आहे.

फ्लेव्हर्समध्ये निर्मिती करताना त्याला शास्त्रीय आधार देऊन औषधी गुणधर्म कायम राहतील, याची दक्षता घेतली आहे.

## 'स्टार्टअप'द्वारे बाजारात आणणार

इनक्युबेशन सेंटरद्वारे या गोळ्या स्टार्टअपच्या माध्यमातून विद्यापीठ बाजारात आणणार आहे. या संशोधनाचे पेटंट घेतले जाणार आहे. या संशोधनासाठी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेसचे संचालक डॉ. आर. के. कामत यांचे मार्गदर्शन लाभले, असे डॉ. निंबाळकर यांनी सांगितले.

# कुलगुरू चषक क्रिकेट स्पर्धा १८ पासून

## देशभरातील संघांचा समावेश; विद्यापीठाच्या मैदानावर सामने

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठातर्फे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा १८ ते ३० नोव्हेंबर दरम्यान घेतली जाणार आहे.

यंदाच्या १७ व्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेचे यजमानपद शिवाजी विद्यापीठाकडे आहे. शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर १८ ते ३० नोव्हेंबरदरम्यान या स्पर्धा खेळविल्या जाणार आहेत. या स्पर्धेसाठी राज्यातील विद्यापीठांच्या कर्मचारी संघासह पंजाब, काश्मीर, दिल्ली, हरियाणा, उत्तरप्रदेश आदी राज्यातील १६ संघांनी आजवर नोंदणी केली आहे, तर अजून चार संघांची नोंदणी करण्यात येणार आहे.

देशाच्या कानाकोपऱ्यात या स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. गतवर्षीची स्पर्धा



काश्मीरमध्ये झाली होती. यंदा यजमानपद शिवाजी विद्यापीठाकडे असल्याने प्रशासनाकडून जय्यत तयारी सुरू आहे.

गेल्या काही दिवसांपासून स्पर्धेवर पावसाचे सावट होते.

पावसामुळे मैदान सुस्थितीत नसल्याने स्पर्धा पुढे ढकलण्याचा प्रयत्नही करण्यात आला. मात्र, देशभरातील अनेक संघांनी पूर्वतयारी केल्याने नियोजित तारखांना स्पर्धा घेण्यात येणार आहेत. मात्र, पावसामुळे खराब झालेल्या मैदानाची दुरुस्ती करण्यासाठी प्रशासनाकडून विशेष प्रयत्न केले जात आहेत. त्याचबरोबर येणारे खेळाडू, प्रशिक्षक यांच्या निवास तसेच भोजनाच्या सोयीसह त्यांना कोणताही त्रास होणार नाही, याची खबरदारी ही विद्यापीठ प्रशासनातर्फे घेण्यात येणार आहे. त्यासाठी संबंधितांवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.